## बिसेन डेन्टल केअर

**डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)**



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ०७ | बुधवार,दि.२५ जानेवारी २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## नॉट रिचेबल मुख्याधिकारी झेंडावंदनाला रिचेबल होणार!

**गोंदिया-** नगरपरिषदेवर प्रशासक राज येऊन वर्ष होत आहे.या वर्षभराच्या कार्यकाळात मुख्याधिकारी यांनाच प्रशासकपदाची जबाबदारी देण्यात आली.त्यातच मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण यांच्याकडेच गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपरिषद विभागाचे प्रशासकीय अधिकारी पद–ाचा सुध्दा प्रभार देण्यात आला.या सर्व गोष्टींच्या संधीना सोडणार नाही ते कसले मुख्याधिकारी.नगरपरिषदेतून पदाधिकारी राज पायउतार होताच प्रशासकराजमध्ये मुख्याधिकारी या वर्षभरात मोजके १०–१५ दिवस सोडले तर ते नगरपरिषदेच्या कार्यालयात बसले असतील असे छातीठामपणे कुणीच नगरपरिषदेतील अधिकारीच काय सामान्य नागरीकही सांगू शकणार नाही.

एवढे चांगले अधिकारी आजच्या घडीला गोंदिया नगरपरिषदेतील जन–तेला मिळाले आहेत.जे १५ आँगस्टच्या झेंडावंदन कार्यक्रमानंतर उद्या २६ जानेवारीच्या झेंडावंदनाकरीता नक्कीच नगरपरिषदेच्या कार्यालयात हजेरी लावून आपण सक्रिय असल्याचा पुरावा देऊन परत बेपत्ता होतील.आणि पुढच्या १ मे रोजीच्या महाराष्ट्रदिनाच्या झेंडावंदनालाच हजेरी लावतील की काय अशी म्हणायची वेळ नागरिकांवर येऊ नये अशी अपेक्षा बाळगायला मात्र काहीही हरकत नाही.

जनता आपल्या समस्या घेऊन नगरपरिषद कार्यालयाचे उंबरठे झिजवून परत जाते.मात्र मुख्याधिकाऱ्यांचे दर्शन काही होत नाही.दर्शन तर सोडा त्यांचा मोबाईल सुध्दा नॉटरिचेबल नेहमीच असतो.

रिचेबल असले तर जनताच नव्हे तर प्रसारमाध्यमातील दोन–तिघांचे सोडले तर ते त्यांचेही भ्रमणध्वनी स्विकारत नाही,ते सामान्य जनतेसाठी उपलब्ध असतील असा अंदाजही लावणे चुकीचे ठरेल.त्यातही अनेक कंत्राटदार आपल्या कामासाठी नगरपरिषदेच्या कार्यालयात येतात,मात्र मुख्याधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासन विभागात असल्याचे सांगितले जाते.

परंतु संबधित त्या ठिकाणी जाऊन पाहणी करतो तर काय साहेबांचा तिथेही थांगपत्ताच नसतो.नगरपरिषदेतील काही लोकांच्या चर्चेनुसार आपल्या सवडी प्रमाणे ते येतात आणि अर्थपूर्ण व्यवहारांशी



निगडित ठेकेदारांच्या दस्तऐवजावर स्व–ाक्षरी करून निघून जातात.किंवा त्या विशेष लोकांना जिल्हाधिकारी कार्यालयात बोलावतात असे बोलले जाते.या अशा दस्तऐवजावर स्वाक्षरी करण्यात ते इतके मग्न होतात की,नागरिकांच्या समस्यांकडे परिस्थितीकडे बघण्यासही त्यांना वेळ मिळत नाही.समस्या घेऊन भेटायला येणाऱ्यांच्या समस्या सोडविण्याकडेही त्यांचा कल नाही.अशा या परिस्थितीत नगर परिषद प्रशासनासह शहरवासी वाऱ्यावर सोडल्या गत आहेत.

नगरपरिषद क्षेत्राातील घरकुल लाभार्थ्यांना थकलेला ऊर्वरीत निधी अजुनही न मिळाल्यामुळे थेट लाभार्थ्यांनी नगरपरिषद गााठतात मात्र मुख्याधिकारीच गैरहजर राहत असल्याने व्यथा मांडायची कुणाकडे अशा प्रश्न त्यांच्यासमोर उभा होतो.त्यातच सतत नॉट रिचेबल असणाऱ्या मुख्याधिकारीवर मात्र जिल्हाधिकारीच काय गोंदियातला एकही लोकप्रतिनिधी बोलायला तयार नाही,कारण त्यांच्याकरीता ते रात्रदिंवस विशेष सेवेत रिचेबल असतात.मुख्याधिकारी म्हणून प्रथम जबाबदारी ही नगरपरिषदेत येऊन आपले कामकाज मार्गी लावण्याची व जनतेच्या अडीअडचणी समजून घेण्याची जबाबदारीही प्रशासक या नात्याने त्यांची असताना त्यांनी या वर्षभरात आपले वेळापत्रकच न ठरवल्याने कर्मचारीही मस्तवाल झाले आहेत.

कुणीही वेळेवर कार्यालयात येत नाही,त्यांच्या कार्यालयातील हलचल रजीस्टरवर नोंद नाही.शहरात विविध ठिकाणी काम सुरु मात्र कुणीही बांधकामचा अधिकारी त्या कामावर दिसून येत नाही.मात्र कार्यालयात गेल्यावर साहेब मात्र कामाच्या ठिकाणी गेल्याचे हमखास ऐकायला मिळते.वित्तविभागाची परिस्थितीवर तर कुणाचेच नियत्रंण नाही,जो करेल खर्चा त्यावरच होईल चर्चा अशी अवस्था या कार्यालयात असून बाजार व कर विभागात तर मोठ्याने सावळागोंधळ बघावयास मिळतो,त्या सर्व व्यवस्थेला कारणीभूत ठरत आहे

मुख्याधिकाऱ्यांची गैरहजेरी व दुर्लक्षतेमुळे शहरातील भ्रष्टाचाराची जननी असलेल्या गटारयोजनेमुळे रस्त्यांची पुर्णतः वाट लागली आहे,यावर प्रसारमाध्यमाप–ासून सामाजिक कार्यकर्ते ,नेतेही ओरडत असताना मुख्याधिकारी गप्प,रस्त्यावरील अतिक्रमण दररोज वाढत चाललेत,पाणी वाहून जाणारे नाल्यावर घर बांधले जाऊ लागले.

शहरातील प्रत्येक वार्डात घाणीचे साम्राज्य पसरल्याने आरोग्य धोक्यात आले आहे.तर ज्या परिसरात स्वतःमुख्याधिकारीच वास्तव्याला असतात त्या परिसरात तर मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातलेला आहे,परंतु या सर्व बाबीकडे लक्ष द्यायला मुख्याधिकाऱ्यांना वेळ कधी मिळणार अशा प्रश्न जनता विचारु लागली आहे.

## अंधश्रद्धा निर्मूलनात शासनाचाच खोडा!

**गोंदिया:** बुद्धिप्रामाण्यवादी महाराष्ट्राची ओळख टिकून राहावी म्हणून राज्यात जादूटोणा विरोधी कायदा करण्यात आला. वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजवण्याचे उपक्रम राबवण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. मात्र, शासकीय अनास्थेमुळे या समितीचे काम पुढे सरकण्यात आडकाठी निर्माण झाली आहे.

महाराष्ट्रात २०13 रोजी जादूटोणा विरोधी कायदा आला. या कायद्याविषयी जनगजागृती, प्रचार आणि प्रसार कार्यक्रम घेण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. ही समिती सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाअंतर्गत काम करते. समितीचे अध्यक्ष सामाजिक न्यायमंत्री असतात. ही समिती २०१४ पासून अस्तित्वात आली आणि कामाला सुरुवात केली. प्रचार, प्रसारासाठीचा आरखडा तयार झाला. परंतु, प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी आवश्यक राजकीय वातावरण उपलब्ध नसल्याने समितीचे काम रेंगाळले आहे. आता तर सामाजिक न्याय खात्याला मंत्री नसल्याने वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी आवश्यक उपक्रम घेण्यावर बंधणे आली आहेत. विशेष म्हणजे समितीच्या कामासाठी चालू आर्थिक वर्षात २२ कोटी मंजूर आहेत. पण तो निधी मार्चअखेरपर्यंत खर्च होण्याची शक्यता दिसत नाही.

जादूटोणा विरोधी कायदा जनजागृती, प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती स्थापन झाल्यानंतर कार्यक्रमांची आखणी केली आहे. यामध्ये प्रामुख्याने जनजागरण, पोलीस प्रशिक्षण आणि शाळा–महाविद्यालयातील कार्यक्रमाचा समावेश आहे. जादूटोणा कायदा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर जिल्हा, तहसील तसेच १० हजार लोकवस्ती असलेल्या गावात सभा आयोजित करण्याचे नियोजन आहे. पोलीस प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्हा पातळीवर एक पोलीस अधिकारी आणि दोन पोलिसांचे प्रशिक्षण. त्यानंतर पोलिसांचे प्रशिक्षण हाती घेण्याचे नियोजन आहे. तसेच शाळा–महाविद्यायात कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

यासाठी दोनशेहून अधिक वक्ते तयार करण्यात आले आहेत. आतापर्यंत समितीने तीन शिबिरे आयोजित केली. यामध्ये सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी यांचे शिबीर, २०१४ मध्ये प्रशिक्षण घेतले, त्यांचे शिबीर आणि तिसऱ्या शिबिरात १०० हून अधिक वक्त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या वक्त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात वर्षभर शाळा–महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात येणार होते. जिल्हा पातळीवर शिबीर आयोजित केले जाणार होते.

या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात या विषयावर बोलण–ारे खात्रीशीर वक्ते तयार केले जाणार आहेत. तर पुढील टप्प्यात पोलीस पाटील, ग्रामसेवक, आशा वर्कर, आरोग्य सेवक यांचे प्रशिक्षण होणार आहे. समितीने हा अतिशय महत्त्वाकांक्षी कार्यक्रम २०१४ मध्ये सादर केला. त्यासाठी प्रारंभी साडेसोळा कोटी रुपये मंजूर झाले. सरकार बदलेले आणि काम ठप्प झाले. त्यानंतर करोना आल्याने दोन वर्षे काम होऊ शकले नाही. आता पुन्हा सरकार बदलले आणि समितीचे काम रेंगाळले आहे.

मुख्यमंत्र्यांकडे कामाचा व्याप अधिक असल्याने समितीच्या कामाला ते वेळ देऊ शकत नाहीत. सामाजिक न्याय खात्याला स्वतंत्र मंत्री हवे. तसेच समितीच्या उपक्रमांना सरकारने प्राधान्य द्यावे, अशी माहिती प्रचार, प्रसार कार्यक्रम अंमलबजावणीचे सहअध्यक्ष प्राध्यापक श्याम मानव यांनी दिली.

## प्रजासत्ताक दिनी जलजीवन मिशनच्या विशेष ग्रामसभा

**गोंदिया :** "हर घर नल से जल" या उपक्रमास लोकसहभाग व पारदर्शकता मिळवून देण्यासाठी विविध स्तरावर व्यापक प्रचार, प्रसिद्धी देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने येत्या २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात येणाऱ्या ग्रामसभेमध्ये जल जीवन मिशन संदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत सदस्यांसोबत ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या सदस्यांना आमंत्रित करण्यात येणार आहे. त्यात समिती सदस्यांची ओळख, त्यांचे अधिकारी, जबाबदारी याची माहिती ग्रामस्थांना अवगत करून देण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी पत्राद्वारे केले आहे.

केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या माध्यमातून २०१९ पासून जल जीवन मिशन हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरूकरण्यात आला आहे. या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना विहीत गुणवत्तेसह पुरेसे ५५ लिटर प्रति मानसी, प्रतिदिनी व नियमित स्वरुपात पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. मार्च २०२४ अखेरपर्यंत संपूर्ण जिल्हा हर घर नल से जल म्हणून घोषित करण्याचे जिल्हा परिषदेने उद्दिष्ट ठेवले आहे.

पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षणांतर्गत पाणी गुणवत्ता चाचणीसाठी प्रशिक्षित करण्यात आलेल्या पाच महिलांना सभेस आमंत्रित करुन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच



प्रत्येक गावांतील पाणी गुणवत्ता निरीक्षक महिलांची संपर्क क्रमांकासहीत नावे गावातील सार्वजनिक ठिकाणी ठळकपणे प्रसिद्ध केली जाणार आहे.

ग्रामसभेदरम्यान जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर योजनेची सविस्तर माहिती, योजनेचे उद्दिष्ट, योजनेतील समाविष्ट उपांगे, मंजूर निविदेची रक्कम, योजनेचा कालावधी, कंत्राटदारांचे नाव, नळ जोडणीची स्थिती याची माहिती दिली जाणार आहे.

ग्रामसभेत क्षेत्रिय तपासणी संच (FTK) संचातुन पाणी नमुना तपासणीचे प्रात्यक्षीत आरोग्य सेवक व जलसुरक्षा मार्फत करणेत येणार आहे.

तसेच ग्रामसभेत क्षेत्रिय तपासणी संच (FTK) च्या माध्यमातून महिलांद्वारे स्त्रोतांची तपासणी व नळ जोडणीव्दारे येणाऱ्या पाण्याच्या नियमित तपासणीबाबतच्या कार्यपध्दतीची माहिती ग्रामसभेमध्ये देणेत येणार आहे.

योजनेअंतर्गत गावातील पाणी पुरवठा सुविधांच्या अनुषंगाने आवश्यक जमा करावयाचा समुदायाचा वाटा (लोकवर्गणी १०%), जमा झालेली रक्कम व उर्वरित जमा करावयाची रक्कम याबाबत आवश्यक कृती योजना आखण्यावाबत चर्चा घडवून आणण्यात येणार आहे.

ज्या ठिकाणी योजनेची भौतिक कामे अंतिम टप्प्यात आहेत अशी गावे "हर घर नल से जल" म्हणून घोषित करणेत येणार आहेत. नळ पाणी पुरवठा योजना पुर्णत्वानंतर योजना शाश्वततेच्या दृष्टीने आवश्यक पाणीपट्टी वसुली.तसेच योजनेची थकीत पाणीपट्टी वसुलीसंदर्भात विशेष चर्चा करण्यात येणार आहे.

जिल्हयातील सर्व ग्राम पंचायतींनी २६ जानेवारीच्या ग्रामसभा यशस्वी पार पाडाव्यात व जलजीवन मिशनच्या अनु–षगाने पाणी व स्वच्छता या प्रमुख घटकांवर लोकाच्यांत जनजागृती करावी. ग्रामस्तरावरील सर्व विकास योजनांच्या माहितीबाबत ग्राम सभेत ग्रामस्थांना मार्गदर्शन करावे असे अवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले आहे.

## बिरसी विमानतळाने दिले ४५० पेक्षा अधिक पायलट; १४ वर्षांपासून सुरू आहे प्रशिक्षण

**गोंदिया–** तालुक्यातील बिरसी येथेआंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ असून, विमानांना उड्डाण घेण्यास अनुकूल वातावरण असल्याने या ठिकाणी इंदिरा गांधी राष्ट्रीय उडान अकादमी रायबरेलीचे पायलट प्रशिक्षण केंद्र सुद्धा सुरु करण्यात आले आहे. मागील १४ वर्षांपासून हे पायलट प्रशिक्षण केंद्र सुरु असून, या विमानतळावरून आता पर्यत ४५०हून अधिक पायलट तयार झाले आहेत.

तत्कालीन विमान वाहतूकमंत्री प्रफुल्ल पटेल यांच्या कार्यकाळात हे विमानतळ तयार करण्यात आले. या ठिकाणी इंदिरा गांधी राष्ट्रीय उडान अकादमी रायबरेलीचे पायलट प्रशिक्षण केंद्र सुरुकरण्यात आले. या प्रशिक्षण केंद्राला आता १४ वर्षे पूर्ण झाली आहेत. येथे पायलट प्रशिक्षण केवळ हिवाळ्याच्या दिवसातच दिले जात होते.

मात्र मागील दीड वर्षा पासून वर्षभर शिकाऊ पायलटला प्रशिक्षण दिले जात आहे. सध्या या प्रशिक्षण केंद्रात २५ मुले आणि २० मुली पायलट प्रशिक्षण घेत आहेत. मागील दीड वर्षत ९० पा यलट तयार झाले आहेत. पायलट प्रशिक्षण केंद्रामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळण्यास सुद्धा मदत होत आहे.



### अधिकाधिक उड्डाणे घेण्यास मदत

बिरसी विमानतळावर गेल्या दीड वर्षापासून इंदिरा गांधी राष्ट्रीय उडान अकादमीचे शिकाऊ पायलट प्रशिक्षण घेत आहेत. येथील हवामान अनुकूल असल्याने पायलटला अधिकाधिक उड्डाणे घेण्यास मदत होत आहे.त्यामुळे चांगले पायलट तयार होत असून, या माध्यमातून त्यांना आत्मनिर्भर बनविण्याचा प्रयत्न आहे.– **कृष्णेंदू गुप्ता, संचालक,प्रशिक्षण केंद्र**

### हिवाळ्यात येतात सर्वाधिक शिकाऊ पायलट

थंडीच्या दिवसात इंदिरा गांधी राष्ट्रीय उडान अकॅडमी रायबरेलीचे शिकाऊ पायलट मोठ्या संख्येने येथे प्रशिक्षण घेण्यासाठी येतात. हिवाळ्यात रायबरेली येथे धुके खूप राहत असल्यामुळे उड्डाण प्रशिक्षण होत नाही.म्हणून शिकाऊ पायलट येथे येतात.– **कुंजल भट्ट, कप्तान (मुख्य उड्डाण प्रशिक्षक)**

## जिल्ह्याचे गॅझेटीअर प्रथमच तयार होणार

**गोंदिया:** पुढील वर्षी १ मे २०२४ रोजी गोंदिया जिल्हा निर्मितीला २५ वर्ष पूर्ण होत असून जिल्हा रौप्य महोत्सव साजरा करणार आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व जिल्ह्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या दर्शनिका (गॅझेटीअर) विभागाच्या वतीने गोंदिया जिल्ह्याचे गॅझेट प्रसिद्ध करण्यात येणार असून गॅझेटीअरचे काम वेळेत पुर्ण करण्यासाठी आपल्या विभागाशी संबंधीत माहिती तातडीने सादर करण्याचे आवाहन दर्शनिका (गॅझेटीअर) विभाग, महाराष्ट्र शासनाचे कार्यकारी संपादक व सचिव डॉ. दि.प्र.बलसेकर यांनी सर्व शासकीय विभागांना केले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत ते बोलत होते. विशेष म्हणजे जिल्ह्याचे गॅझेटीअर प्रथमच तयार होणार आहे.



### जिल्हा गॅझेटीअरमध्ये दहा प्रकरणांचा समावेश असणार

**या गॅझेटिअरमध्ये वेगवेगळ्या विषयानुसार १० प्रकरणांचा समावेश असेल. यामध्ये जिल्ह्याचा भूगोल, जिल्ह्याचा इतिहास, येथील लोकसंस्कृती, कृषी व जलसिंचन, उद्योगधंदे, बँक व्यापार व वाणिज्य, वाहतूक व दळणवळण, आर्थिक विकास, प्रशासन, सामाजिक सेवा, संस्कृती व प्रेक्षणीय स्थळे या प्रकरणांचा समावेश आहे. यासाठी जिल्हा प्रशासनातील सर्व विभाग काम करणार आहेत तसेच विदर्भातील इतिहासाचा अभ्यास करणारे विद्यापीठातील प्राध्यापक यांची निवड या जिल्हा गॅझेटिअर निर्मितीसाठी केली जाणार आहे. यावेळी विविध विभागाचे प्रमुख व सालेकसा येथील एम.बी. पटेल कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. नामदेव हटवार उपस्थित होते.**

जिल्हाधिकारी कार्यालय येथे गोंदिया जिल्हा गॅझेटिअर निर्मितीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्याचा इतिहास, भूगोल, सांस्कृतिक ओळख सांगणारे परिपूर्ण असे गॅझेटीअर तयार करण्यात येणार आहे. हे गॅझेटीअर पुढील सहा महिन्यात तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

गॅझेटिअर बाबत माहिती देतांना बलसेकर यांनी सांगितले की, राज्य शासनाला सर्व जिल्ह्यांचे गॅझेटिअर बनवून द्यायचे आहे. त्यामुळे आपण तळमळीने लवकरात लवकर आपल्या विभागाशी संबंधीत माहिती दिली तर गॅझेटीअरचे काम वेळेत पुर्ण होऊ शकेल. गॅझेटिअर हे ब्रिटीशकाळापासून वापरात असून ब्रिटीश लेखक जेव्हा येथे आले ते येथील भौगोलिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीशी अवगत नव्हते. त्यावेळेस त्यांना गॅझेटिअरची खूप मदत झाली. आजही आपण एखादी माहिती शोधण्याकरीता जुने गॅझेट उपयोगात आणतो. हायकोर्टानेही काही निर्णय देतांना गॅझेटिअरची मदत घेतली आहे. यातच गॅझेटीअरचे महत्व विशद होते. गॅझेटिअर हे भविष्यासाठी उत्तम असून आपल्याला पाहिजे असलेली जुनी माहिती येथील संस्कृती, भौगोलिक रचना माहित होते. त्यामुळे माहिती गोळा करतांना भूमिपुत्रांना समाविष्ट करुन घेणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ऐतिहासिक ठिकाणे, पर्यटन स्थळे, ब्रिटीशकाळीन वास्तुशिल्पाचे छायाचित्र गॅझेटिअरसाठी लागणार असल्यामुळे ते गोळा करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्हा निर्मितीनंतर झा–लेले प्रशासकीय बदल, जिल्ह्याचा इतिहास, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या योजना, उपक्रम, रस्ते, पाटबंधारे, कृषी, उद्योग, शिक्षण, वैद्यकीय, सामाजिक व अन्य योजना, लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी राबविलेल्या विविध योजना, त्यांचे लक्ष व साध्य, व्यापारवृद्धी, बँकिंग सेवा, धर्मदाय संस्था, स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर जिल्ह्याच्या संस्कृतीत झालेले कालानुरूप बदल, जिल्ह्यातील पर्यटन–प्रेक्षणीय स्थळे, नाट्य संस्कृती, जलसिंचन प्रकल्प, बचत गट, सामाजिक संस्था, गोंडी संस्कृती व कला, दंडार कला, वृत्तपत्र आणि पत्रकारिता, व्यावसायिक रंगभूमी यासह विविध विषय, विकासाचे टप्पे व बदल याची नोंद घेणारी माहिती उत्कृष्ट छायाचित्रांसह एक महिन्याच्या आत सादर करावी असे आवाहन त्यांनी केले.

## शिवसेना व वंचित बहुजन आघाडी एकत्र

**मुंबई:–** शिवसेना आणि वंचित बहूजन आघाडीच्या युतीची घोषणा उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर यांनी आज संयुक्त पत्रकार परिषदेत केली. त्यामुळे राज्यात पुन्हा शिवशक्ती आणि भीमशक्ती एकत्र आली आहे. मुंबईतील आंबेडकर भवनात प्रकाश आंबेडकर आणि उद्धव ठाकरे यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत, सुभाष देसाईसह आदी नेते पत्रकार परिषदेत उपस्थित होते.




### हुकुमशाहीविरोधात एकत्र

पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर यांनी मोदी सरकार आणि भाजपवर घणाघाती हल्ले केले. उद्धव ठाकरे म्हणाले, देशहिताच्या नावाखाली सध्या अनेक भ्रम पसरवले जात आहे. देशाची हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू आहे. हुकूमशाहीविरोधात आम्ही एकत्र आलो आहोत. सध्या देशात प्रचंड वैचारिक प्रदूषण सुरू आहे. हे वैचारिक प्रदूषण दूर करण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. त्यामुळे सर्वांनाच पुन्हा मोकळा श्वास घेता येईल.तर, प्रकाश आंबेडकर यांनीही एक दिवस पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाचाही अंत होईल, असे म्हटले आहे.

### आज एका स्वप्नाची पूर्ती झाली

युतीची घोषणा करताना उद्धव ठाकरे म्हणाले, आज एका स्वप्नाची पूर्ती झाली आहे. महाराष्ट्रातील जनता या युतीची आतुरतेने वाट पाहत होते. प्रकाश आंबेडकर यांचे आजोबा आणि माझे वडील या दोघांनीही समाजातील वाईट चालीरितींवर घणाघाती प्रहार केले. आताद–खील राजकारणात काही वाईट चालीरीती शिरल्या आहेत. त्यांचा नायनाट करण्यासाठी या दोन्ही पिढ्यांचे वारसरार एकत्र आले आहेत.

### वंचितचा अद्याप मविआत समावेश नाही

वंचित बहूजन आघाडी आणि शिवसेनेने आज युती केली असती तरी वंचितचा अद्याप महाविकास आघाडीत समावेश झालेला नाही. याबाबत प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आमचा विरोध केवळ राष्ट्रवादी काँग्रेसला होता. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासोबत आमचे पूर्वी चांगले सख्य होते. त्यामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आम्हाला महाविकास आघाडीत घेण्यासाठी विरोध करणार नाही, असा विश्वास वाटतो.

### पवारांकडे पाहत राहिलो अन माझ्याच लोकांनी दगा दिला

शरद पवारांसोबत माझे पूर्वी चांगलेल सख्य होते, असे वक्तव्य प्रकाश आंबेडकरांनी दिला. त्याचा दाखला देत मी तर शरद पवारांकडेच बघत राहिलो आणि माझ्याच लोकांनी मला दगा दिला, असे वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केले. उद्धव ठाकरेंच्या या वक्तव्यावर चांगलाच हशा पिकला. वंचितच्या मविआतील समावेशाबाबत उद्धव ठाकरे म्हणाले, मोदी आणि भाजपविरोधात, हुकुमशाहीविरोधात आम्ही एकत्र आलो आहोत. त्यामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष वंचितला विरोध करतील असे वाटत नाही. लवकरच दोन्ही पक्षांची चर्चा करुन याबाबत भूमिका स्पष्ट करू तसेच, वंचितसोबत व इतर मित्र पक्षांसोबत जागावाटप कसे होईल, याबाबत विचार करुनच वंचितसोबत युती केल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले.

### यालाच लोकशाही म्हणायचे का?

मोदी सरकारवर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले, सध्या देशात न्यायालये, तपास यंत्रणा सर्वांवरच दबाव आहे. नुकतेच कायदामंत्री किरण रिजीजू म्हणाले की, न्यायालयांमध्येही लोकप्रतिनिधींनी नियुक्त केलेले न्यायाधीश असावेत. केंद्रीय कायदामंत्र्याचे हे वक्तव्य संविधानाला अनुसुरुन आहे का? यालाच लोकशाही म्हणायचे का?तर, प्रकाश आंबेडकर म्हणाले, आरएसएस आणि नरेंद्र मोदी देशात जातीवादी राजकारण करत आहेत. २००२ ची एक बीबीसीची डॉक्युमेंट्रीही नरेंद्र मोदींना आता सहन होत नाही. या माहितीपटावर बंदी घातली जात आहे. ही हुकुमशाहीकडे वाटचाल आहे. मात्र, मोदींचे नेतृत्वही एक दिवस संपुष्टात येईल.

### शिवसेनेचे हिंदुत्व मान्य– प्रकाश आंबेडकर

शिवसेनेचे प्रबोधनकार ठाकरेंचे हिंदुत्व आम्हाला मान्य असल्याचे यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले. प्रकाश आंबेडकर म्हणाले, प्रबोधनकारांनी समाज व्यवस्थेत सुधारणा व्हावी, या दृष्टीकोनातून हिंदुत्वाची मांडणी केली. सर्व समाजाला एकत्र आणणारे त्यांचे हिंदुत्व होते. हे हिंदुत्व आम्हाला मान्य आहे.

### भाजपची बाहेरख्याली

उद्धव ठाकरे म्हणाले, भाजपने तर जम्मू–काश्मिरात पीडीपी पक्षासोबत युती केली. बिहारमध्ये नितीश कुमार यांनी आरएसएस संपवण्याची भाषा केली होती, त्या नितीश कुमारांसोबत भाजपने युती केली. म्हणजे भाजपने बाहेरख्याली केली तरी चालते आणि आम्ही वटपौर्णिमा जरी साजरी केली, तरी यांचा आ–क्षेप, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी भाजपचा समाचार घेतला.

## संपादकीय

# प्रबोधनाची गती वाढविणे अत्यावश्यक

महाराष्ट्र ही प्रबोधनाची भूमी म्हणून सर्व देशामध्ये सन्मानाने ओळखली जाते.कारण या राज्यामधे अनेक मोठमोठे प्रबोधनकार निर्माण होऊन गेले आणि आजही अनेक सच्चे प्रबोधनकार आपल्या वाणी आणि लेखणीने जनतेचे वास्तववादी प्रबोधन करीत आहे.परंतु तरीसुद्धा या राज्यामधे प्रबोधनाचा वारसा घेऊन चालणाऱ्या लोकांसाठी सध्याची परिस्थिती अत्यंत भीषण आणि बिकट आहे.कारण महाराष्ट्रात ज्या संत महापुरुषांनी येथील कष्टकरी,कामकरी,गोरगरीब जनतेला अज्ञान,अंधश्रद्धा,वाईट चालीरीती आणि रूढी,परंपरा यामधून बाहेर काढण्याचा जो आटोकाट प्रयत्न केला, त्याला तडा देण्याचे आणि ती प्रबोधनाची परंपरा विस्कळीत करण्याचे काम मागील काही वर्षांमध्ये सातत्याने सुरूआहे.त्यामुळे या महान समाजहिताच्या प्रबोधन परंपरेला वाचविण्यासाठी महाराष्ट्राच्या संत परंपरेला मानणाऱ्या सुज्ञ नागरीकांनी जनजागृती करणे अत्यावश्यक आहे.

सध्या महाराष्ट्रात काही तथाकथित संत,महाराज यांनी लोकांना आमची खरी संत परंपरा न सांगता चुकीच्या मार्गाने नेण्याचा विडाच उचलला आहे की काय अशी भीती निर्माण झाली आहे.अध्यात्माच्या नावाखाली समाजामध्ये अंधश्रद्धा पसरविण्याचे आणि बहुजन समाजाला विशेषतः आमच्या माता भगिनींना संभ्रमित करण्याचे काम काही ढोंगी महाराज करीत आहे.त्यासाठी धर्माचा आधार घेतल्या जात आहे.देवाचा वापर केल्या जात आहे आणि लोकांना अज्ञान आणि अंधश्रद्धेकडे नेण्याचा अतिशय घृणास्पद प्रयत्न सुरूआहे. भगवान शंकराच्या पिंडीवर एक लोटा पाणी आणि एक बेलपत्री वाहल्याने आपल्या जीवनातल्या कोणत्याही समस्या सहज दूर होऊ शकतात अशा प्रकारे अवैज्ञानिक आणि अतार्कीक विचार समाजामध्ये रुजवणे सुरूआहे. महाराष्ट्रामध्ये अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा आहे.भारतीय संविधानामधे सुद्धा विज्ञानवादी विचाराचा प्रचार आणि प्रसार करणे हे भारतीय नागरिकांचे मूलभूत कर्तव्य म्हणून सांगितले आहे.तसेच सातशे वर्षापासूनची महान संत परंपरा या महाराष्ट्रात होऊन गेली आहे. त्या संत परंपरेचा लोककल्याणकारी विचार मुळापासून उपटून टाकण्यासाठी काही लोकांचा आटोकाट प्रयत्न सुरू आहे.आमच्या संतांनी आम्हाला भक्तीचा खरा मार्ग सांगितला आहे.देवाची भक्ती कशा प्रकारे केली पाहिजे आणि खरी ईश्वरसेवा कोणती हे सर्व संतांनी अतिशय चांगल्या व सोप्या पध्दतीने आम्हाला शिकविले आहे.त्यामुळे लाखो रुपये घेवून खोटे अध्यात्म सांगणाऱ्यांची आम्हाला आवश्यकता नाही.

महाराष्ट्रात प्रबोधनाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संघटना,चळवळी कार्यरत आहेत.वारकरी संप्रदाय,मराठा सेवा संघ,अंधश्रद्धा निर्मूलन समिती, गुरुदेव सेवा मंडळ,आंबेडकरी चळवळ यासारख्या परिवर्तनवादी विचारांच्या विविध सामाजिक चळवळी आमच्या संतपरंपरेचे खरे विचार समाजासमोर मांडण्याचा अहोरात्र प्रयत्न करीत असतात.या संघटनांकडे अनेक कीर्तनकार, प्रवचनकार,व्याख्याते,लेखक व समाजाचे खऱ्या अर्थाने प्रबोधन करणारे अनेक प्रबोधनकार आहेत. त्यांच्या माध्यमातून अनेक वर्षापासून महाराष्ट्रामध्ये संत परंपरेचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवून लोकांना संत ज्ञानेश्वर,संत नामदेव,संत तुकोबांपासून तर आधुनिक काळातील संत गाडगेबाबा,तुकडोजी महाराजांपर्यंत सर्व संतांचे मानवतावादी आणि परिवर्तनवादी विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या प्रबोधनकारांची धडपड सुरू असते. सत्यपाल महाराजांसारखा प्रचंड ताकतीचा प्रतिभावंत कीर्तनकार दररोज हजारो लोकांना आमच्या संतपरंपरेचा अस्सल वारसा जीवाच्या आकांताने व अतिशय तळमळीने सांगत असतो.त्यांच्यासारखे अनेक सप्तखंजरीवादक त्यांनी तयार केले आहेत.विविध चळवळीतील हे सर्व कीर्तनकार,प्रबोधनकार व्याख्याते महाराष्ट्रामधे जातीय सलोखा आणि सर्वधर्मसमभाव निर्माण करण्याचा सतत प्रयत्न करीत असतात.त्यामुळे आपल्या राज्याचे वातावरण आनंदी व मित्रत्वाचे राहण्यास खूप मदत होते.

परंतु अध्यात्माच्या नावाखाली कोट्यावधी रुपयांचा चुराडा करणारे व स्वतःची तुंबडी भरणारे अनेक बुवा,बापू,महाराज आपल्या देशात निर्माण झाले आहेत आणि ते लोकांना धार्मिक द्वेष,हिंसा, अंधश्रद्धा,संविधानाचा धिक्कार यासारख्या अत्यंत चुकीच्या गोष्टी सांगून लोकांना संभ्रमित करीत आहे. त्यांची यंत्रणा अतिशय मोठी आहे. त्यांच्याकडे सर्व प्रकारची संसाधने उपलब्ध आहे.प्रायोजकत्व स्वीकारणारे मोठमोठे उद्योगपती आहेत.त्यामुळे शेकडो एकराच्या जागेवर भव्य दिव्य आलिशान मंडपामध्ये त्यांचे लोकांना अध्यात्मावर दिव्य ज्ञान देणे सुरूअसते.लोकांना मोह,माया त्यागायला सांगणारे हे भंपक महाराज स्वतः मात्र प्रचंड मोहमाया गोळा करून हजारो कोटींची संपत्ती गोळा करतात हे आपण पाहिलेले आहे.त्यातील बरेच जण सध्या तुरुंगात आहेत.त्यामुळे या ढोंगी महाराजांपासून समाजाला वाचविण्यासाठी खऱ्या प्रबोधनकारांना आता आपल्या प्रबोधनाची गती तर वाढवावी लागेलच.त्याचबरोबर आपल्या प्रबोधनाचे विषय,मार्ग,पद्धती आणि उपाय सुद्धा बदलावे लागतील.तरच आपण महाराष्ट्राच्या संत परंपरेला वाचवू शकतो.कारण हे हाय प्रोफ ाईल बापू,महाराज महाराष्ट्राच्या महान संतांचा साधा उल्लेखही करत नाही.त्यांच्या एखाद्या अभंगाचा दाखला देत नाही आणि त्यांचे विचारही समाजाला सांगत नाही.त्यामुळे आमच्या खऱ्या संत परंपरेचा वारसा उध्वस्त करण्यासाठीच या कोट्याधीश बाबांचा हा सगळा आटापिटा सुरू आहे काय अशी शंका घेण्याला भरपूर जागा आहे.त्यामुळे महाराष्ट्राच्या पवित्र संत परंपरेला मानणाऱ्या प्रबोधनकारांनी व लोकांनी आता या खोट्या,ढोंगी व करोडपती महाराजांपासून समाजाला वाचवण्यासाठी पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

**प्रेमकुमार बोके**
**अंजनगाव सुर्जी,९५२७९१२७०६**

# कपिल चिखलोंढे दिल्लीतील गणतंत्र दिन परेडमध्ये सहभागी होणार



**गोंदिया :** गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित येथील नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचा (एनसीसी) विध्यार्थी कपिल चिखलोंढे याची २६ जानेवारी २०२३ रोजी होणाऱ्या दिल्ली येथील राजपतावरील गणतंत्र दिनाच्या परेड साठी निवड करण्यात आली आहे. गोंदिया नजिकच्या जब्बारटोला येथील रहिवासी कपिल मन्साराम चिखलोंढे हा नमाद महाविद्यालयात बी.ए अंतिम वर्षात शिकत आहे. तो बी.ए प्रथम सत्रापासून राष्ट्रीयछात्र सेनेचा नियमित विध्यार्थी आहे. गणतंत्र दिनाच्या राजपथावरील संचलनात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड चाचणी नागपूर आणि नंतर कोल्हापूर येथे झाली.
दोन्ही निवड चाचणीत उत्तीर्ण झाल्यानंतर कपिल चिखलोंढे याची दिल्लीच्या राजपथावरील गणतंत्र दिनाच्या परेड संचलनासाठी निवड झाली. कपिल चिखलोंढे यांच्यापुवी नमाद महाविद्यालयातील भूषण सराटकर,आकाश भालाधरे,नेहा गराडे,विकास शिवणकर आदी विद्यार्थ्यांनी दिल्लीच्या राजपथावरील गणतंत्र दिनाच्या परेडमध्ये सहभाग नोंदवून महाविद्यालयाचे नाव गौरवान्वीत केले आहे. कपिल चिखलोंढेच्या निवडीबद्दल गोंदिया शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक खासदार प्रफुल पटेल, अध्यक्षा वर्षा पटेल, सचिव राजेंद्र जैन,संचालक निखिल जैन,प्राचार्या डॉ.शारदा महाजन,४ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना नागपूरपूचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विशाल मिश्रा, एनसीसीचे ऑफिसर कॅप्टन डॉ.एच.पी.पारधी,महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# राजना पूर्णा,ता.चांदूरबाजार,जि.अमरावती येथील सत्यशोधक समाज

राजना पूर्णा सध्याच्या चांदूरबाजार तालुक्यातील व पुर्वीच्या ऐतिहासीक एलिचपूर किंवा अचलपूर तहसीलमधील गाव होय. अमरावती परतवाडा या राज्य महामार्गावरील मेघनाथपूर या बसथांब्यापासून पुर्वेस साधारण तीन मैल म्हणजे पाचेक किलोमीटर अंतरावर असलेले आडवळणाचे गाव. पूर्णा नदीच्या काठावर वसलेले सातपुडा पर्वताच्या कुशीत गडप झालेले गाव आहे. आजघडीला चार ते पाच हजार लोकसंख्या असलेले गाव, पुर्वी डांबरी रस्ते नसताना शोधूनही न सापडणारे, अशा या गावात आज प्रवेश करताना दिसते ती एक जिल्हा परिषद प्राथमिक वरिष्ठ शाळेची प्रशस्त इमारत. अर्थात ही इमारत ज्या जागेवर उभी आहे ती जागा होती सीतारामजी सोनाजी पाटील जामोदकर यांची. सदर जागा सीतारामजी पाटील यांनी शाळेकरिता दान दिली होती. सदरहू गृहस्थांनी गावात सर्वप्रथम ब्राह्मणाशिवाय सत्यशोधक समाज मताप्रमाणे सत्यनारायण केला होता.

सत्यशोधक मताप्रमाणे झालेल्या या कार्यक्रमाचा वृत्तांत सत्यशोधक मताचे पत्र दीनमित्रमध्ये ता.१८ जानेवारी १९२२, अंक १०,पृ.७ व २ वर आलेला आहे. सदर सत्यनारायण सीतारामजी पाटील यांच्या घरी १४ डिसेंबर १९२१ ला संपन्न झाला. त्यावेळी पुजेचे काम आनंदान पार पाडल्या गेले होते. अशी माहिती गोविंद जागुडी इंगळे यांनी दीनपत्र पत्रास पाठविली होती.

सीतारामजी सोनाजी जामोदकर हे त्याकाळी गावातील पटवारी होते. त्यांना दोन मुलीच होत्या. शांताबाई व अनुसया या गावात १९२१ साली प्राथमिक शाळा स्थापन झाली याकाळात



**सतीश जामोदकर**
**अखंड १२८,चंद्रावतीनगर,साईनगरजवळ अमरावती मो.९४२३३७४६७८**

ती कुठे भरत होती याची माहिती मिळत नाही. परंतु १९२१ साली सीतारामजी यांनी आपली गावाजवळची जागा या शाळेस दान दिली. आजही शाळेच्या भिंतीवर संगमरवरी दगडात कोरलेला फलक लाल अक्षरात ठळकपणे दिसून येतो. यावरून सीताजी हे शिक्षणप्रेमी असले पाहिजे. नव्हे तर त्यांना सत्यशोधक मताची व त्यांच्या कार्याची माहिती कळली असली पाहिजे. याच परिसरात वीस–पंचवीस किलोमीटर अंतरावर सत्यशोधक करजगाव आहे. त्याचाही हा परिणाम असावा.

या सत्यनाायणाच्या पूजेचे काम बळीरामजी मास्तर जामोदकर यांनी केले होते. बळीरामजीचे पूर्ण नाव बळीराम विठोजी जामोदकर होते. त्यांना नारायण नावाचा एकच मुलगा होता. बळीरामजी गावात ब्राम्हणांशिवाय धार्मिक विधी करीत असावेत. ज्याकाळी ब्राह्मणेतरांना शिक्षणाची संधी नव्हती. आणि ब्राह्मणेतरांचे वाचन–लिखाणाचे ब्राम्हणाशिवाय काम होत नव्हते त्याकाळी ब्राम्हणाशिवाय सत्यनारायणाची विधी करण्याची हिंमत करणे निश्चितच सोपे नव्हते. त्यांना गावात खूप मान होता. त्यांची जन्मतारीख उपलब्ध नसून त्यांचा मृत्यू ६ ऑक्टोबर १९६६ साली झाला होता.

या कथेच्या किंवा पूजेच्या वेळी गावातील चंद्रभानजी पाटील जामोदकर हे उपस्थित होते.चंद्रभानजी यांच्याकडे गावची पाटीलकी होती. त्यांना देवाजी नावाचा मुलगा होता. पुढे हे घराणे वारकरी पंथाचे झाले. या पूजेच्या वेळी शिवरामजी पाटील जामोदरकर, राजरामजी पाटील जामोदकर, बारीकराव वाठ व बारीकराव मराठा उपस्थित होते. बारीकराव वाठ यांचे पूर्ण नाव बारा पूर्णाजी वाठ होते. तर नाशिकराव मराठा यांचे आडनाव जवंजाळ होते. त्यांच्या वडिलांचे नाव हनवतराव होते. सीतारामजी पाटील जामोदकर यांच्या दान दिलेल्या शाळेच्या जागेवर प्रशस्त शाळेच्या इमारतीसोबत महात्मा जोतीराव फुले यांचा पुतळा सुद्धा उभारलेला आहे. पुतळ्याचे अनावरण १९९६ साली दिवंगत मौजी राज्यपाल तथा आंबेडकरी विचाराचे प्रेरक दादासाहेब उर्फ रा.सु.गवई यांच्या हस्ते व दादासाहेब कोरडे (माजी मंत्री) यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते. दादासाहेब कोरडे यांचे वडील मारोतराव हे करजगावच्या सत्यशोधक पैकी एक होते.

अशा प्रकारे छोट्या–छोट्या गावामध्ये महात्मा जोतीराव फुलेंच्या विचाराची ठिणगी पडलेली दिसून येते. या परिसरामध्ये पूर्णा नगर (थुगावा), वातोंडा, ब्राम्हणवाडा थडी, शिरजगार कसबा, शिरजगार बंड, करजगाव, बेलुरा व वणी इत्यादी गावात सत्यशोधक मंडळी कार्यरत होती असे दिसून येते. यापासून प्रेरणा देऊन आजही काम करण्याची गरज एकविसाव्या शतकातही ब्रह्मवृदांच्या हैदोसामुळे आवश्यक आहे असे वाटते.

(टिप सदर लेखाचे लेखक यांचे हे मूळ)

# गोसे धरण प्रकल्पग्रस्ताच्या उध्वस्त जीवनाचा आँखोदेखा...



नुकतेच गोसे धरणातील बुडित क्षेत्रातील गांवाना भेटी दिल्या. सगळीकडेच गांवाना पाण्याचा वेढा. शाळा व प्राथमिक आरोग्य केन्द्राची इमारत अर्धवट पाण्यात बुडालेली. घराच्या मातीच्या भिंती कोलमडून पडलेल्या. कवलारू घरांची छतं कुणाच्या तरी आधाराने लटकलेली. जूनी झालेली लाकड़ अधुन मधून मुंडकी बाहेर लटक़वलेली. सगळीकडेच मातीची ढिगारं. चहु बाजुनी उदासीनता व भकासपणा. कांही घरांमध्ये जीवंत माणसं चालतांना फिरतांना. मात्र त्यात जीवंतपणा नव्हता. असं वाटायचं मृत शरीरं इकडून तिकडे भटकताहेत. जगण्याची उमिद हरवलेली माणसं. बालपण, तारुण्य, प्रौढत्वाचे अनुभव घेवून वार्ध्यक्याकड़े झुकलेले. आजोबा पनजोबा पासून इथेच याच जमिनीवर फुललेली वेल सुकतांना अनुभवतांना भळभलुन आलेलं. हिरवीगार असलेली वनराई व सोनेरी चंदेरी पीकं देणारी शेती पाण्याखाली गुडूप झालेली. धरणाच्या पाण्यानं अक्राळ विक्राळ रूप घेतलेलं. सर्वांनाच आपल्या कवेत घेतलेलं. कुणी गांव सोडून लांब दुरच्या गांवी पुनर्वसनच्या ठिकाणी वसलेले. ज्यात गांवठान जमिनीवर १० हजार चौ फुट क्षेत्रात बनवलेली घरं. नुसत्याच विटा सिमेंटच्या भिंती. नव्या ठिकाणी गावातली भाऊबन्दकी एकोपा हरपलेला. शेती असणारा भूमिहीन झालेला. नवीन ठिकाणी जगण्याची कसलीही साधने नसलेला. दुसऱ्या ठिकाणी दुसऱ्यांच्या शेतीत मजूरीशिवाय पर्याय नाही. भूसंपादनानंतर मिळालेला पैसा घर अन अन्य बाबीमध्ये खर्च झालेला. त्यामुळे जुन्या अन नव्या ठिकाणी दोन्हीकडे नैराश्यच नैराश्य. युवकांना व्यावसायिक प्रशिक्षण घेवून कर्ज घेण्यासाठी बँकेला तारण हवे ते ही हिरावलेलं. अश्या प्रकारे या मोठ्या धरणामुळे प्रकल्पग्रसतांची सगळीकडूनच होत आली, नागवनुक ।

किनाऱ्याला लागूनच मछिमारांच्या होड्या पाण्यात तरंगताना. धरणातील पाण्यात दोन चार मच्छीमारांच्या होडया द्वारे जाळे टाकतांना. ही अनाधिकृत मासेमारी. अशी किती दिवस चालणार? एकीकडे शेतकऱ्यांना जमिनीच्या बदल्यात पैसा मिळाला मात्र पारंपारिक मच्छिमाराणां काय मिळालं? पारंपरिक मच्छीमार हा वैनगंगा नदीवर बारमाही मासेमारी मोफत करीत होता व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. आता यामध्ये मोठे मोठे ठेकेदार, खाजगी कंपनी, भंडावलदार इत्यादी मछिमारीचा ठेका घेण्यासाठी पुढे येणार, मोठ्या रकमांची बोली लावणार अन लहान मच्छिमरांच्या तोंडचा घास हिसकावणार. मोठे ठेकेदार लहान मछिमाराणां धरणात मासेमारी करण्यासाठी पैसे वसुल करुन जाळे टाकणयास परवाने देतील. खरंच, ह्या मोठ्या धरणांनी कोणाचे भलं अन कुणाचं नुकसान झाले? लहान शेतकरी व लहान मछिमाराचं जीवन अक्षरशः उध्वस्त झालं.

भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील गोसे या गांवी वैनगंगा नदीवर बांध बनविन्याचे महाराष्ट्र सरकारने १९८३ साली जाहिर केले. पुढे १५० पेक्षा जास्त बाधित गांवांचे सर्वेक्षण, बुडित क्षेत्रात येणाऱ्या शेत जमीनी, बांधाची लांबी व ऊंची, प्रकल्पग्रस्त गांवे व लोकसंख्येवर होणारा परिणाम, एकूण प्रकल्पावर होणारा एकूण खर्च इत्यादीचा प्रस्ताव सादर झाल्यावर सरकारने प्रकल्प खर्च रु ३७२ कोटी जाहिर केला. पुढे चिमूरचे खासदार विलास मुत्तेमवार यांनी विदर्भाचा वीशरा ह्रिशिर्शली म्हणत प्रधानमंत्री राजीव गांधी यांचे हस्ते भूमिपूजनही करवून घेतले व "इंदिरा सागर" म्हणून नामकरण ही केले.

ब्रिटिशकालीन भूसंपादन कायदा १८९४ द्वारा नागपुर व भंडारा जिल्ह्यातील बुडित क्षेत्रातील कुटुंबान्न ९३ गांवांतील गांवठान जमिनीवर पुनर्वसन करण्याचे ठरले. १९८३ ते १९९७ पर्यन्त शेतकऱ्यांच्या शेतजमीनी कवडीमोल भावाने म्हणजे एकरी रु १० हजार प्रमाणे (आज ह्याच जमिनीचा भाव रु ६–१० लाख एवढा) भूसंपादित केल्या. सोने पिकविणाऱ्या शेतजमीनीचा भाव व उध्वस्त जीवनाची किंमत इतकी कमी असु शकते कां? असे म्हणत "गोसे धरण प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती" च्या नांवाखाली सामाजिक कार्यकर्ते विलास भोंगाड़े यांच्या नेतृत्वात लढा उभा राहिला. "आम्ही धरणातील पाण्यात जीव देवू, मात्र कोणत्याही परिस्थितीत आम्ही आमची घरे, शेतजमिनी सोड़णार नाही" असे म्हणत हजारों लोकांनी धरणातील पाण्यात अक्षरशः बुडेपर्यंत आंदोलन केले, त्यामुळे नाईलाजाने सरकार ने अधिक भरपाई देण्याचे मान्य करित प्रकल्पग्रस्ताना पहिल्यांदा रु ३०० कोटी व दूसऱ्यांदा रु १२०० कोटीचे पैकेज सरकारला द्यावे लागले.

१९८३ ला गोसे धरणाचा नियोजित प्रकल्प खर्च रु ३७२ असतांना २०२३ ला एकूण प्रकल्प खर्च रु २० हजार कोटी पर्यन्त पोहोचला तरीही काम पूर्ण न झालेले. मागील ४० वर्षात सत्ताधाऱ्यानी विदर्भावर अन्याय करीत वार्षिक बजेटमध्ये नियमित आर्थिक तरतूदी न केल्यामुळे हा खर्च वाढत गेला. आणि पर्यायाने इतक्या वर्षात बांध पूर्ण क्षमतेने काम करण्यासाठी धरणात पूर्ण पाणी भरण्याची ऊंची ४४.५०० मीटर होवून ही राज्याची सिंचन क्षमता ०.५% ने वाढू शकली नाही. तसे धरण बांध काम पूर्ण झाल्यामुळे धरणात पाणी साचवन्याचे काम प्रत्यक्ष २०१३ पासून सुरु झाले. त्यामुळे बुडित क्षेत्रातील शेतजमीनीवर पीक घेण्याचे काम सुरु होते. धरणात साचलेल्या पाण्यात लिफ्ट इरिगेशन द्वारा शेतकऱ्यांना सिंचाई २००९ पासून मिळाली परतुं डाव्या व उजव्या कालव्याच्या संरचना पूर्ण न झाल्यामुळे सिंचाई होवू शकली नाही.

**दीनानाथ वाघमारे,**
**संघटक,संघर्ष वाहिनी,नागपूर**
**मो.९३७०७७२७५२**



# अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी केले मोबाईल परत




**गोरेगावः** शासनाने अंगणवाडी सेविकांना दिलेल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड होत नाही, त्यामुळे त्यांना दुसऱ्या मोबाईलमधून कामकाज करावे लागत आहे. दिवसेंदिवस कामकाज वाढून मोबाईलची क्षमता पुरत नसल्याने गोरेगाव बालविकास प्रकल्प विभाग कार्यालयात सेविका व मदतनीसांनी (दि.२३) आंदोलन करून १४४ मोबाईल परत केले आहे. शासनाच्यावतीने २ वर्षापूर्वी सेविका व मदतनिसाना सरकारी कामकाजासाठी मोबाईल दिले होते.

सदर मोबाइलची क्षमता कमी असणे, यासह विविध समस्या उदभवत असल्याने अनेक वेळा कळवून आंदोलने करुनही मोबाईल बदलून मिळत नसल्यामुळे मोबाईल अंगणवाडी सेविका व मदतनीसानी परत केले. मोबाइलची क्षमता कमी असून,मोबाइल गरम होणे यासह सरकारी कामकाजात विविध समस्या उदभवत असल्याने हँडसेट बदलून मिळण्याची एकमुखी मागणी सेविका व मदतनीस यांनी केली आहे.

आंदोलनाचे नेतृत्व आयटकचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले,जिला उपाध्यक्ष विना गौतम, तालुका अध्यक्ष पुष्पा ठाकुर,सचिव अजंना ठाकरे, निवृता मेश्राम, ममता वासनिक, संतोषी बघेले, भुमेश्वरी रहांगडाले,वर्षा बावनकर,रत्नमाला गेडाम यांच्या नेतृत्वात प्रकल्प अधिकारी श्रीमती श्रीवास्तव, विस्तार अधिकारी श्रीमती मेंढे यांना निवेदन देऊन मोबाईल परत करण्यात आले.

# २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिन

गोंदिया : भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस २५ जानेवारी १९५० हा दरवर्षी राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी मतदारांना, विशेषत: नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे, सुलभरित्या त्यांची नाव नोंदणी करुन घेणे या उद्देशाने दिनांक २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या दिवसाची मतदाना–इतकं अमुल्य नसे काही बजावू हमखास, मताधिकार आम्ही ही थीम आहे.

त्यानुसार सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, सर्व तहसिल कार्यालय व जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी तेरावा "राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करण्यात येत असून जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे २५ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता "राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ मतदारांचा सत्कार करण्यात येणार असून मतदार यादीत नाव समाविष्ट झालेल्या १८ ते १९ या वयोगटातील नविन मतदारांना जिल्हाधिकारी यांचेमार्फत मतदान ओळखपत्र वितरीत करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील उत्कृष्ट काम करणारे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इडज) यांचा सत्कार करण्यात येणार आहे. असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी चिन्मय गोतमारे यांनी कळविले आहे.




# "बजावू हमखास मताधिकार आम्ही..."

देशात दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी "१३ वा राष्ट्रीय मतदार दिवस" राज्य, जिल्हा, मतदान केंद्र स्तरावर साजरा करण्यात येणार आहे. यावर्षी राष्ट्रीय मतदार दिवसासाठी "मतदानाइतकं अमूल्य नसे काही बजावू हमखास, मताधिकार आम्ही" हा विषय आयोगाकडून देण्यात आला आहे.

भारतात २५ जानेवारी १९५० रोजी निवडणूक आयोगाची स्थापना झाली. हा दिवस देशभर "राष्ट्रीय मतदार दिवस" म्हणून साजरा केला जातो. या देशाचे जबाबदार नागरिक म्हणून आपल्या देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. भारत लोकशाही प्रधान देशात मतदार हाच खऱ्या अर्थाने राजा आहे. मतदारांमध्ये जनजागृती तसेच बळकटी करणासाठी मतदारांनी निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे, हे या राष्ट्रीय मतदार दिवसाच्या निमित्ताने अधोरेखित करायला हवे.

नवीन मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती व्हावी तसेच नवीन मतदारांनी आपले नाव मतदार यादीत नोंदणी करावी, या गोष्टींची जनजागृती होण्यासाठी आपले कर्तव्य म्हणून हा दिवस साजरा करण्यात येतो. नागरिकांचे निवडणुकीत योगदान वाढावे, याकरिता भारत सरकारने सन–२०११ पासून "राष्ट्रीय मतदार दिन" साजरा करण्याचा निर्णय घेतला.

आपण या देशाचे नागरिक आहोत आणि आपल्या लोकशाही राज्यपद्धतीने प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने निवडणुकीत मतदानाचा हा हक्क बजाविण्यासाठी मतदान करावे, असे आवाहन आजच्या या दिवसानिमित्त करण्यात येत आहे.

गणराज्य दिनाच्या एक दिवस आधी "राष्ट्रीय मतदार दिन" साजरा करण्यामागचे कारण असे की, भारत निवडणूक आयोगाची स्थापना दि.२५ जानेवारी १९५० रोजी झाल्याने हा दिवस देशभर "राष्ट्रीय मतदार दिवस" म्हणून साजरा केला जातो. दि.२६ जानेवारी १९५० च्या (प्रजासत्ताक दिन) आधी एक दिवस निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. जगातील सर्वात यशस्वी लोकशाही म्हणून आपल्या भारत देशाकडे पाहिले जाते. ही लोकशाही यशस्वी करण्यामागे येथील नागरिकांचा म्हणजे मतदारांचा मोलाचा सहभाग आहे. कारण भारतीय लोकशाहीत मतदारच मतदानाद्वारे लोकप्रतिनिधींची निवड करीत असतात.

आपल्या देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारत निवडणूक आयोगाने सर्व जगाला दाखवून दिलेले आहे. मतदानाविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन स्तरावरून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. नवीन मतदारांमध्ये जागृतीसाठी या निमित्ताने जिल्ह्यात विविध स्पर्धा, जनजागृतीचे कार्यक्रमही शालेय, महाविद्यालयीन पातळीवर आयोजित करून गाव, तालुका व जिल्हास्तरावरही भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आपले नाव मतदारयादीत नोंदविणे आवश्यक आहे. कारण आपले नाव मतदार यादीत न नोंदविल्यामुळे संबंधित मतदार मतदानाच्या पवित्र हक्कापासून वंचित राहतात. मतदान करणे हा प्रत्येक नागरिकाचा पवित्र हक्क आणि सामाजिक कर्तव्यही आहे. लोकशाही प्रबळ, मजबूत व भक्कम करण्यासाठी प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजाविणे आवश्यक आहे.

वय वर्षे १८ ते १९ या वयोगटातील युवकांच्या मतदानाचे प्रमाण सध्याच्या जास्तीत जास्त व्हावे, हे उद्दिष्ट. युवक मतदारांची नोंदणी वाढविण्याकरीता विद्यापीठे, महाविद्यालये आणि त्यांचे युवक प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधण्यात येतो. विद्यापीठ तसेच महाविद्यालयांमार्फत नवीन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्त्व पटवून त्यांना योग्य मार्गदर्शन करुन या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मोलाचे सहकार्य मिळण्यासाठी त्यांचे मोठ्या प्रमाणावर प्रबोधन करण्यात येते.

**कैलाश गजभिये**
**उपसंपादक**
**जिल्हा माहिती कार्यालय,गोंदिया**

# रेल्वेगाड्यांची लेटलतिफीने रेल्वे चौकी मार्गावर वाहतूक कोंडी



**गोंदिया:** प्रवासी रेल्वेगाड्यांचे अनियंत्रित परिचालन आणि यामुळे प्रवाशांना तासोनतासच काय, दिवसभर रेल्वेगाड्यांची प्रतिक्षा करावी लागत आहे. तर दुसरीकडे मालगाड्यांचे परिचालक नियमित होत असल्याने नागरिकांमध्ये कमालीचा असंतोष पहावयास मिळत आहे. तसेच शहराला दुभागणाऱ्या लोहमार्गावर चौक्यांवर रेल्वेगाड्या थांबविले जातात. यामुळे रेल्वेचौकी असलेल्या मार्गावरील वाहतुकीची कोंडी होते. या प्रकारामुळे गोंदिया शहरात रेल्वे प्रशासनाविरूध्द चांगलाच संताप व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे या समस्यांकडे पाठ फिरविणाऱ्या जनप्रतिनिधीविरूध्दही सोशल मिडीयावर चांगलीच आगपाखड केली जात आहे.

रेल्वे प्रशासनात चाललेय काय? असा प्रश्न एक-दोन दिवसांपासून नव्हेतर गेल्या वर्षभरापासून उपस्थित होत आहे. गोंदिया हे शहर मुंबई-हावडा या मुख्य लोहमार्गावरील प्रमुख व वर्दळीचे आहे. गोंदिया रेल्वे स्थानकावरून दररोज हजारोच्या संख्येत प्रवासी रेल्वेगाडीने प्रवास करतात. एवढेच नव्हेतर या मार्गावरून दरदिवशी जवळपास ४० हून अधिक प्रवासी रेल्वेगाड्या धावतात. त्यातल्यात्यात लांब पल्ल्यासाठी रेल्वेचा प्रवास सोयीस्कर ठरत असल्यामुळे प्रवासी देखील रेल्वे प्रवासाला प्राधान्य देतात. मात्र रेल्वे प्रशासनाने जणु रेल्वे प्रवाशांचे सुड घेणे सुरू केले आहे. प्रवासी रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक कोलमडले आहे. अनियंत्रित परिचालनामुळे रेल्वेगाड्या ८ ते १२ तास उशिरा धावत आहेत. परिणामी रेल्वे प्रवाशांना स्थानकासह रेल्वेगाड्यांमध्ये तासोनतास प्रतिक्षा करावी लागते. विशेष म्हणजे, एखादी रेल्वेगाडी वेळेवर आली तर त्या रेल्वेगाडीला आऊटवर तब्बल दोन ते तीन तास थांबअवून मुख्य रेल्वे मार्गाने मालगाड्यांने प्राधान्य देवून सोडले जाते. एवढेच नव्हेतर गोंदिया शहराला दुभागणाऱ्या लोहमार्गावरील चौकींवर रेल्वेगाड्या थांबविल्या जातात. त्यामुळे चौकीही तब्बल चार ते पाच तास बंद राहतात. परिणामी दोन्ही बाजूला वाहतुकीची कोंडी होते. यामुळे गोंदिया शहरातील नागरिकांसह रेल्वे प्रवाशांकडून रेल्वे प्रशासनाविरूध्द चांगलाच संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, या संदर्भात सोशल मिडीयावर स्थानिक जनप्रतिनिधींवरही नागरिकांकडून ताशेरे ओढले जात आहेत.

### रेल्वे फलाटावर मालगाड्यांचा कब्जा

**नागपूर-रायपूर या लोहमार्गावरील गोंदिया जंक्शन वर्दळीच्या दृष्टीकोनातून प्रमुख मानले जाते. या रेल्वे स्थानकावर ७ ते ८ फलाट आहेत. याशिवाय बायपास मार्ग आहे. मात्र या रेल्वे स्थानकाच्या फलाटावर मालगाड्यांचा कब्जा राहतो. त्यामुळे गोंदिया रेल्वे स्थानकावर उभ्या असलेल्या मालगाड्यामुळे प्रवासी गाड्यांना वेळेवर फलाट मिळत नाही. परिणामी सर्वच प्रवासी गाड्या आऊटरवर किंबहुना रेल्वे चौक्यांवर थांबविल्या जातात. विशेष म्हणजे, अप आणि डाऊन या रेल्वेमार्गावर जवळपास १० ते २५ किमीच्या अंतरावर एकदोन नव्हेतर चक्क चार ते पाच रेल्वेगाड्या उभ्या पहावयास मिळत आहेत. या प्रकाराला घेवून रेल्वे यंत्रणेतील अधिकारी मौन बाळगून आहेत.**

### शहरातील सहा प्रमुख मार्गावर रेल्वे फाटक

**गोंदिया शहर रेल्वेमार्गाने दुभागलेला आहे. मुख्य मार्गावरील उड्डाणपूल व भुमिगत रेल्वे पुल वगळता कुठल्याही मार्गावर पुल नाही. त्यामुळे मुख्य बाजारपेठ येथे येण्या-जाण्यासाठी शहरवासीयांना लोहमार्गावरील रेल्वे फाटक ओलाडणे भाग पडते. गोंदिया शहरातून नागपूर-गोंदिया, गोंदिया -रायपूर, गोंदिया-बल्लारशा, गोंदिया-बालाघाट असे रेल्वे मार्गाचे जाळे पसरले आहेत. या सर्व मार्गावर जवळपास गोंदिया शहरात सहा रेल्वे फाटक आहेत. या फाटकावरुन ये-जा करणाऱ्या नागरिकांना दर ५ ते १० मिनिटात नागरिकांना वाहतुक कोंडीला समोर जावे लागते.**

# शिंदे-फडणवीस सरकारने बोनसच्या नावावर केली शेतकऱ्यांची फसवणूक-प्रफुल्ल पटेल



**गोंदिया:** शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास आणि त्यांना अधिकाधिक लाभ मिळवून देणे हा राष्ट्रवादी काँग्रेसचा मुख्य उद्देश आहे. गोंदिया-भंडारा हे दोन्ही जिल्हे धान उत्पादक असून यात शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळेच राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ७०० रुपये बोनस मिळवून दिला.मागील दोन वर्षांत शेतकऱ्यांना कोट्यवधी रुपयांचा लाभ मिळाला.मात्र राज्यातील विद्यमान शिंदे-फडणवीस सरकारने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ३७५ रुपये बोनस देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप खा. प्रफुल्ल पटेल यांनी शुक्रवारी (दि.२०) येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला. पत्रकार परिषदेला माजी आ. राजेंद्र जैन,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर,माजी नगराध्यक्ष दामोदर अग्रवाल, वीरेंद्र जायस्वाल उपस्थित होते.

खा.प्रफुल्ल पटेल म्हणाले, सरकारने शेतकऱ्यांच्या विषयावर राजकारण न करता त्यांचे हित कसे साधले जाईल याचा विचार करावा.बोनस जाहीर करताना आजूबाजूच्या राज्यातील परिस्थितीचा आढावा घेणे गरजेचे आहे.उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असून शेती करणे तोट्याचा सौदा होत आहे. अशात बोनसमुळे शेतकऱ्यांना मदत होत होती. पण हेक्टरी बोनस जाहीर करून सरकारने शेतकऱ्यांचा हिरमोड केल्याचा आरोप पटेल यांनी केला. हावडा-मुंबई मार्गावरील गोंदिया एक महत्त्वपूर्णस्थानक आहे. सर्वाधिक मालवाहतूक सुद्धा याच मार्गावरून होते. रेल्वेला सर्वाधिक उत्पन्न देणारा हा मार्ग आहे.आपल्या कार्यकाळात रेल्वेचे जाळे या दोन्ही जिल्ह्यांत विस्तारण्यास आणि अनेक गाड्यांना थांबा मिळण्यास मदत झाली. रेल्वे गाड्यांच्या सध्याच्या लेटलतीफ कारभारासंदर्भात रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करणार असल्याचे खा. पटेल यांनी सांगितले.गोंदियातील नाटयगृहाच्या बांधकामावर पटेल म्हणाले की त्या समोरील काढण्यात आलेल्या दुकानांमुळे नाटयगृहाचे सौंदर्य झाकोळले जात असल्यामुळे त्यात बदल घडविण्यात यावा अशी आमची मागणी आहे. गोंदियातील उड्डाणपुलाविषयी बोलतांना पटेल म्हणाले की जुनं तोडण्यापूर्वी व नविन बांधकाम पूर्ण होण्यापूर्वी लोकांना कमी त्रास कावा अशी योजना आखायला हवी होती पण ते न झाल्यामुळे आता जनतेला त्रास सोसावा लागत असल्याचेही ते म्हणाले.



# बाल लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमाला आयुष्य संपेपर्यंत कारावास

**गोंदिया:-** बाल लैंगिक अत्याचार प्रकरणातील नराधम आरोपीला जिल्हा न्यायाधिश तथा विशेषशे सत्र न्यायालयाने २३ जानेवारी रोजी आजन्म समश्र कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. राजेंद्रकुमार शहारे (५६) रा. देवरी असे आरोपीचे नाव आहे. आरोपी व १० वर्षीय पीडित मुलगी हे नातेवाईक असून २०२१ मध्ये शाळेतून मैत्रीणींसोबत घरी जाताना आरोपीच्या घरासमोर खेळत असायची. नातेवाईक असल्याचा फायदा उचलून तो तिला विविध आमिषे दाखवून जवळील जंगलात घेऊन जाण्याचा प्रयत्न करायचा. मात्र ती येत नसल्याचे पाहून १३ जुलै २०२१ रोजी तिला जबरदस्तीने जंगलात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. तसेच ही घटना कुणाला सांगितल्यास ठार मारण्याची धमकी दिली. परिणामी ही घटना भीतीपोटी पीडित मुलीने घरी सांगितली नाही.मात्र मैत्रीणीला सांगितले.

दरम्यान आरोपी हा दररोज पीडितेला जबरदस्तीने जंगलात घेऊन जात असल्याची बाब गावातील एका महिलेच्या लक्षात आली.तीने हा प्रकार पीडित मुलीच्या आईला सांगितले.याप्रकरणी २८ जुलै रोजी चिचगड पोलिसांनी आरोपीवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करुन आरोपीला अटक केली. तत्कालीन तपासी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक मनोहर इस्कापे यांनी तपासाअंती आरोपीविरुद्ध विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.दरम्यान न्यायालयात सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील कृष्णा पारधी यांनी ५ साक्षदारांची साक्ष नोंदविली.तर आरोपीचे वकील व सरकारी वकीलांच्या युक्तीवादानंतर आरोपीवर गुन्हा सिध्द झाल्याने न्या.एन.बी.लवटे यांनी आरोपी राजेंद्रकुमार शहारे याला कलम ४२ पोक्सो ॲक्टमधील तरतुदीनुसार आजन्म कारावास, १० हजार दंड व दंड न भरल्यास १ महिन्याचा अतिरिक्त कारावास तसेच कलम ५०६ नुसार १ वर्षाचा सश्रम कारावास व १ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिन्याचा साधा कारावासाची शिक्षा ठोठावली.तसेच दंडाची रक्कम पीडिताला देऊन मनोधर्य योजनेतंर्गत पीडितेला ते सानुग्रह राशी देण्याचे आदेशित केले आहे. न्यायालयीन कामकाजात चिचगडच्या मपोशि रिंपी हुकरे यांनी काम पाहिले.

# हिंसक वाघाला जेरबंद करा-माजी मंत्री राजकुमार बडोलेनी केली वनमंत्र्याकडे मागणी

**अर्जुनी/मोरगाव:-** या भागातील लोकांचे जिवास धोकादायक ठरलेल्या हिंसक वाघास जेरबंद करा, असा आदेश राज्याचे वनमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी वन अधिकाऱ्यांना दिले.



माजी सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांनी ना. मुनगंटीवार यांना अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील गौरनगर येथे थांबविले. तिथेच उभा जनता दरबार लागला. या दरबारात लोकांनी आपल्या व्यथा मांडल्या. वाघांने एका महिलेला मारले.अनेकांच्या जनावरांची शिकार केली.वाघ गावात येत आहे. त्यामुळे शेतात जाणे.घरा बाहेर पडणे धोकादायक झाले. मुलांना शाळेत पाठविणे सुध्दा धोकादायक झाले .अनेकांचा कामधंदा बुडाला. त्या हिंसक वाघाचा बंदोबस्त करा, नुकसान भरपाई द्या, अशी मागणी बडोले यांनी केली. लोकांनी सुध्दा आपबिती सांगितली. त्यामुळे वनमंत्री द्रविले. त्यांनी लगेच संबंधित अधिकाऱ्यांना मोबाईल लावला. त्या हिंसक वाघाला जेरबंद करा. लोकांना निर्भयपणे जगू द्या. कारवाईच्या संदर्भात कळवा असे आदेश दिले. त्या आदेशाचे लोकांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. हर्सया चेहऱ्याने गावकरी परतले.

यानंतर विविध गावच्या गावकऱ्यांनी आपआपल्या गावातील तक्रारींचे निवेदन देणे सुरू केले. कोणी रस्ता मागितला. कोणी रखडलेल्या पुलाची व्यथा मांडली. काहींनी पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी जलपुरवठ्याची मागणी केली. कोणी बायपास मार्ग मागितला असे अनेक निवेदने दिली. मंत्री महोदयांनी लोकांची निवेदने घेतली. चर्चा केली. तेव्हाच सुटकेचा निश्वास सोडला. त्यानंतर समाधानी चेहऱ्याने बाहेर पडले.

# वारकरी संत परंपरेचा विद्रोह त्यांना अजूनही गिळता आला नाही-चंद्रकांत वानखेडे



**नागपूर :** येत्या दिनांक ४ व ५ फेब्रुवारी २०२३ ला वर्धा येथे होऊ घातलेल्या अ.भा.विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष शेतकरी नेते, पत्रकार, गांधी का मरत नाही या बहुचर्चित पुस्तकाचे लेखक चंद्रकांत वानखेडे यांचा सत्कार नागपूरला सत्यशोधकी विचाराच्या विविध संघटनांनी केला. यावेळी सत्काराला उत्तर देताना, विद्रोही परंपरेतील अनेक प्रवाह रा.स्व.संघाने गिळंकृत केले हे खरे असले तरी, महाराष्ट्रातील वारकरी संत परंपरेचा विद्रोह त्यांना अजूनही गिळता आला नसल्याचे प्रतिपादन मा.चंद्रकांत वानखेडे यांनी अनेक दाखले देत केले. संत नामदेव, संत तुकाराम ते संत गाडगेबाबा पर्यंतच्या वारकरी संतांचा विद्रोह प्रखर समतावादी असल्याने तो आजतागायत सनातनी प्रवाहाला गिळंकृत करता आला नसल्याचे त्यांनी याप्रसंगी स्पष्ट केले.गाईचे रक्त पिणाऱ्या गोचीडांना मारण्याच्या नादात गाईवरच रट्टे देऊन घायाळ केले जात असल्याचे सांगून परिवर्तनवादी चळवळीतील वैगुण्यावर त्यांनी नेमकेपणाने बोट ठेवले. बहुजन चळवळींमध्ये हेच घडत असल्यामुळे ज्यांच्यासाठी चळवळी आहे तोच त्यापासून दूर जाताना दिसतो, हे वास्तव त्यांनी यावेळी मांडले. रक्तपिपासू गेचूडांचा नायनाट करताना गाई-बैलांना इजा होणार नाही, गेचूडच बरे आहे असे वाटणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, असे ते म्हणाले.

विद्रोही सांस्कृतिक प्रवाह मजबूत करण्याच्या दृष्टीने विविध परिवर्तनवादी संघटनांनी एकत्रित काम करण्याची गरज लक्षात घेऊन वर्धा येथे होऊ घातलेल्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर बुद्ध, मार्क्स, फुले, शाहू, आंबेडकर, गांधी ,संत परंपरा हा समतेच्या बाजुचा प्रवाह एकत्रित करून शोषितांचा लढा गतीमान करण्याचा प्रयत्न या निमित्ताने होत आहे. यामुळेच “गांधी का मरत नाही’ या बहुचर्चित लोकप्रिय पुस्तकाचे लेखक, प्रसिद्ध पत्रकार, शेतकरी नेते असलेले विद्रोही साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष चंद्रकांत वानखेडे यांचा सत्कार, फुले शाहू आंबेडकरी विचारवंत प्रभाकर पावडे यांचे हस्ते करण्यात आला.

हा कार्यक्रम सक्करदरा परिसरातील सेवादल महाविद्यालायाच्या सभागृहात पार पडला. यावेळी बहुजन संघर्षचे संपादक नागेश चौधरी, विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रा.प्रतिमा परदेशी, प्रसिद्ध शिल्पकार गोपाल नायडू, सत्यशोधक चळवळीच्या साहित्याचे अभ्यासक, ओबीसी चळवळीचे मार्गदर्शक आणि वर्धा येथे होऊ घातलेल्या १७ व्या अ.भा.विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे मुख्य संयोजक डॉ. अशोक चोपडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा.प्रतिमा परदेशी यांनी शोषणाविरुद्ध सर्व शोषितांना एका प्लॅटफॉर्मवर आणून शोषकांविरुद्धचा विद्रोह तीव्र करण्यासाठी विद्रोही साहित्य संमेलन असल्याची भूमिका सविस्तर विषद केली.

या संमेलनाचे मुख्य संयोजक डॉ. अशोक चोपडे यांनी ओबीस, दलित, आदिवासी शेतकरी कामगार बहुजन समाजाचा आवाज बुलंद करण्यासाठी या संमेलनाचे आयोजन असल्याचे सांगितले. सत्यशोधकी प्रवाहाची एकी करुन शेतकरी आत्महत्या, शेतमालाला भाव, बेरोजगारी, ओबीसी जनगणना इत्यादी प्रश्नावर संमेलनात चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिला, बहुजन महापुरुष यांचा अपमान करणाऱ्या तसेच दलित, ओबीसी, आदिवासी, मुस्लिम, ख्रिश्चन आदी लोकांचा छळ करणाऱ्या सनातनी व्यवस्थेच्या विरोधात लढण्याचे नियोजन या संमेलनात सर्वांनी सहभागी होऊन करायचे असल्याचे त्यांनी सांगितले.

बहुजन संघर्षचे संपादक नागेश चौधरी यांनी वुई ॲड अवर नेशनहुड डिफाईन या पुस्तकातील सूत्रानुसार बहुजनांना कमकुवत करण्याचे प्रयत्न चाललेले असताना, संघ देशभर बहुजनविरोधी मोहिमा फत्ते करत असताना बहुजनातील बेकी धोकादायक असल्याचेत्यांनी अनेक दाखले देत स्पष्ट केले .

फुले शाहू आंबेडकरी विचारवंत प्रा. प्रभाकर पावडे यांनी म.गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकमेकांना प्रश्न उपस्थित करून पुढे जात होते. त्यांच्या पद्धती वेगळ्या असल्या तरी दोघांचीही धडपड समग्र समाजहितासाठी असल्याचे त्यांनी अनेक उदाहरण देवून सांगितले. दोघेही एकमेकांच्या विरोधात हेल्दी डिबेट करत होते, अशी माहिती त्यांनी दिली.प्रसिद्ध शिल्पकार गोपाल नायडू यांनी आपल्या भाषणात फॅसिझमच्या विरोधात सर्व परीवर्तन चळवळींनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली.

सत्कार समारोहाचे संचालन विद्रोही कवयित्री माधुरी सेलोकर यांनी केले तर आभारप्रदर्शन सत्यशोधक समाजाचे नागपूर जिल्हाध्यक्ष टेमराज माले यांनी केले. यावेळी वर्धा जिल्ह्याच्या वतीने राजू कळसाईत आणि नंदकुमार वानखेडे यांनी सुद्धा सामेलानाध्यक्ष चंद्रकांत वानखेडे यांचा सत्कार केला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजय बाभुळकर, अनुज हुलके, बाबा बीडकर, टेमराज माले, शरद वानखेडे, विनोद उलीपवार, संजय नरखेडकर, शुभांगी मेश्राम, मिरा मदनकर, इंद्रपाल जौंजाळकर, रमेश सोनवाणे, प्रदीप शेंडे आदींनी प्रयत्न केले.

# शिक्षक मतदार संघासाठी गोंदियात १० मतदान केंद्रावर होणार मतदान

**गोंदिया :** विधानपरिषदेच्या नागपूर शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीसाठी ३० जानेवारी २०२३ रोजी मतदान होणार असून गोंदिया जिल्ह्यात एकूण १० मतदान केंद्रावर हे मतदान होणार आहे. या निवडणुकीत ३८८१ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यात स्त्री मतदार १२१८ तर पुरुष मतदार २६६३ आहेत. मतदानाची वेळ सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत असणार आहे.

तहसील कार्यालय रुम नंबर ०१ तिरोडा ४८९ मतदार, जिल्हा परिषद हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज रूम नंबर ०४ दवणीवाडा ता. गोंदिया २४५ मतदार, बैठक सभागृह अपर तहसीलदार कार्यालय प्रशासकीय इमारत जयस्तंभ चौक गोंदिया ११९९ मतदार, तहसील कार्यालय रूम नंबर ०१ आमगाव ३७३ मतदार, तहसील कार्यालय रूम नंबर ०१ सलेकसा १४२ मतदार, तहसील कार्यालय रूम नंबर ०१ गोरेगाव २८५ मतदार, तहसील कार्यालय रूम नंबर ०१ सडक अर्जुनी २४६ मतदार, तहसील कार्यालय रूम नंबर ०१ देवरी ३६६ मतदार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रूम नंबर ०२ बालाजी मंदिर जवळ नवेगावबांध तालुका अर्जुनी मोरगाव २११ मतदार व तहसील कार्यालय रूम नंबर ०१ अर्जुनी मोरगाव ३२५ अशी मतदान केंद्र व मतदारांची आकडेवारी आहे.

# खासगी कंपन्यांच्या फायद्यासाठीच जुनी पेन्शन योजना बंद; ॲड. आंबेडकर

**नागपूर:** सध्या देशातील वातावरण बघता प्रत्येकाने भविष्याचा विचार करणे गरजेचे आहे. कामगार मंत्री असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पेन्शनचा अधिकार मिळवून दिला. परंतु, नंतर ती बंद करण्यात आली. ही योजना बंद करण्यात भाजपसोबत अन्य पक्षांचाही सहभाग आहे. खासगी कंपन्यांच्या फायद्यासाठी ही योजना बंद करण्यात आल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषदेत केला

वंचित बहुजन आघाडीतर्फे शिक्षक मतदार संघातील उमेदवार प्रा. प्रदीपकुमार खोब्रागडे यांच्या प्रचारासाठी आंबेडकर नागपूरमध्ये आले होते. त्यावेळी ते पत्रकार परिषदेत बोलत होते. ते म्हणाले की, काळानुरूप बदल आवश्यक आहे. शिक्षणातील धोरणाला विरोध नाही. परंतु, नियोजन करून त्यात बदल करायला हवे. पहिल्यांदा ज्यावेळी बदल झाला, त्यावेळी पाच वर्षे गोंधळाची स्थिती होती. शिक्षकांना पूर्ण माहिती नव्हती. सध्या तंत्रज्ञानाचे युग आहे. विद्यार्थ्यांना शिकवणारा शिक्षक अनस्कील राहत आहे.

नवे शिक्षण धोरण राबवताना यावर विचार करण्याची गरज आहे. अमरावती व नागपूर विद्यापीठांतर्गत ८ हजार प्राध्यापक नेट-सेट नसल्यामुळे कायमस्वरुपी नाही. त्यांचा न्यायालयीन लढा सुरू आहे. त्यांचा शिक्षणाचा अनुभव लक्षात घेता, सरकारने त्यांचा कायम करण्याचे आश्वासन न्यायालयाला दिले पाहिजे.गडचिरोलीच्या सूरजागड खाणीतील लोह महाराष्ट्र वगळता इतर राज्यांना देण्यात येत आहे. येथे प्रकल्प सुरू झाल्यास २० हजार लोकांच्या हाताला काम मिळेल, असे आंबेडकर म्हणाले. यावेळी प्रा. दीपककुमार खोब्रागडे, रवी शेंडे, राजू लोखंडे आदी उपस्थित होते.

# मूळचा सौंदड निवासी सुबोध भैसारे 'जेएमएफसी' परीक्षेत राज्यात पहिला

**गोंदियाः** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग आणि न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेत गोंदिया जिल्ह्यातील सौंदड येथील मूळगाव परंतू सध्या सोलापूरचा रहिवासी असलेल्या सुबोध भैसारे हा राज्यात पहिला आला आहे. सुबोध याने २०० पैकी तब्बल १७८ गुण मिळवत राज्यात पहिला क्रमांक पटकवाले आहे. सुबोधचे वडील अशोक भैसारे देखील न्यायाधीश राहिले आहेत. त्यामुळे त्यांची दुसरी पिढी न्यायिक क्षेत्रात येणार आहे. 'जेएमएफसी' परीक्षा देत वयाच्या २७ व्या वर्षी सुबोधने यशाला गवसणी घातली आणि त्याने राज्यात पहिला क्रमांक मिळवला. सुबोधच्या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सुबोधचे १० वी पर्यंतचे शिक्षण सोलापुरात व



१२ वीचे शिक्षण हे चंद्रपुरात झाले आहे. पुण्यातल्या आयएलएस महाविद्यालयात कायद्याचे शिक्षण घेतले आहे. आपण बालपणापासूनच वडीलाकंडे बघत होतो,सोबतच त्यांच्यासोबत असलेल्यांचे राहणीमान व विचार आपल्या मनात रुजले,तेव्हापासूनच या न्यायीक क्षेत्रात जाण्याचा मानस पक्का केला. सोबतच आपल्यात न्यायदान योग्यरितीने करण्याची गुणवत्ता असल्याची जाणिवही झाल्याने १२ वी नंतर विधीच्या अभ्यासक्रमाकडे वळल्याचे सांगितले.

सुबोध याचे वडील अशोक भैसारे हे मूळचे गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील सौंदड येथील आहेत. ते स्वतः देखील न्यायाधीश राहिले आहेत. धुळे, चंद्रपूर, नागपूर, पुणे, ठाणे आणि सोलापूर या ठिकाणी जिल्हा न्यायाधीश म्हणून सेवा बजावली आहे. ते सध्या सोलापूरच्या ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष आहेत. विशेष म्हणजे सुबोध भैसारे याचा मोठा भाऊ शुभम भैसारे हा देखील मागील वर्षी IAS परीक्षेत उत्तीर्ण झाला आणि आता सुबोध न्यायाधीश झाला आहे. त्यामुळे भैसारे कुटुंबियांच्या आंनदाला पारावार उरलेला नाही.

अशोक भैसारे यांनी आपण आज जरी आपल्या मूळगावापासून लांब राहत असलो तरी नातेवाईक आणि आपले घर, शेती सौंदड परिसरातच असल्याने आम्ही सहा महिने, वर्षातून गावाकडे येत असतो असे सागंतच मुलाने यशाचे गाठलेले शिखर हे त्यांने केलेल्या परिश्रमाचे फळ असल्याचे सांगितले.

# पिंडकेपार पोहोचला ११० कोटींवर

**गोंदिया:** गोंदिया मध्यम प्रकल्प विभगातर्फे पिंडकेपार परिसरात मध्यम प्रकल्पाला मंजूरी मिळाली होती. या मध्यम प्रकल्पाची किंमत २.४३ कोटी रुपये होती. परंतु शासनाच्या लेटलतीफ धोरणामुळे व वनविभागाच्या अडथड्यामुळे ३८ वर्षानंतर आता या प्रकल्पाची किंमत ११० कोटी २१ लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे. आता नवीन शासन या प्रकल्पाला पूर्ण करुन शेतकऱ्यांसाठी सिंचनाची व्यवस्था उपलब्ध करुन देईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. परंतु क्षेत्राचे लोकप्रनिधी या विषयावर किती गंभीर आहेत, हे येणारे काळच सांगेल.

गोंदियाला लागून असलेल्या पिंडकेपार क्षेत्रात १९८२-८३ मध्ये पिंडकेपार मध्यम प्रकल्पाला मंजूरी मिळाली होती. २ कोटी ४३ लाख रुपयांचे खर्च करुन सदर प्रकल्प पूर्ण करावयाचे होते. या प्रकल्पाला पूर्ण करण्यासाठी डव्वा व रापेवाडा येथील शेतकऱ्यांची १५६ हेक्टर शेतजीन संपादीत करावयाची आहे. तर वनविभागाची ३४.७७ हेक्टर जमीन संपादीत केली जात आहे. १९८३ मध्ये प्रकल्पाच्या कामाची सुरुवात करण्यात आली. २००८-०९ मध्ये प्रकल्पाची किंमत ४० कोटी ६६ लाखांवर पोहोचली. काम सुरु असतानाच वनविभागाचे आपल्या क्षेत्रातील जमीन देण्यास नकार दिला. त्यामुळे प्रकल्पाचे काम अर्ध्यातच अपूर्ण सोडावे लागले. गोंदिया मध्यम प्रकल्प विभागाकडून या प्रकल्पाला पूर्ण करण्यासाठी



शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात आला. वनविभागाला याबाबत सविस्तरपणे समजविण्यात आले. यावेळी वनविभागाने सदर बाब गंभीर्याने घेऊन २०१६ मध्ये प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मंजूरी प्रदान केली. गोंदिया मध्यम प्रकल्प विभागाने वनविभागाची ३४.७७ हेक्टर जमीन संपादीत केली. त्याची भरपाई म्हणून वनविभागाला ९ कोटी ८९ लाख रुपये देण्यात आले. तसेच या प्रकल्पाला पूर्ण करण्यासाठी डव्वा व रापेवाडा येथील शेतकऱ्यांची १५६ हेक्टर शेतजमीन संपादीत करावयाची आहे. याबाबतचा प्रस्ताव विभागाने शासनाला सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाने मंजूर करताना संपादीत जमिनीच्या भरपाईसाठी ३३ कोटींचा निधी मंजूर केला आहे. २ जानेवारी २०१९ रोजी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ११० कोटी ८ लाख रुपये गोंदिया मध्यम प्रकल्प विभागाच्या खात्यात जमा केले आहे.

### वनविभागाची आडकाठी

**परंतु वनविभागाची मंजूरी मिळून ३ वर्षाचा काळ लोटूल्यानंतरही या प्रकल्पाचे काम सुरु होवू शकले नाही. या विषयाला घेऊन क्षेत्राचे लोकप्रतिनिधी जर वेळेवर गांभीर्य दाखविले असते तर सदर प्रकल्प वनविभागाच्या मंजुरीनंतर वर्षभरातच पूर्ण केले जावू शकले होते. आता नवीन शासन सदर प्रकल्प पूर्ण करणार अशी आशा शेतकऱ्यांनी बाळगली आहे. परंतु यासाठी लोकप्रतिनिधींची इच्छा जाहीर होणे आवश्यक आहे.**

### ११७० हेक्टर जमिनीचे होणार सिंचन

**हा प्रकल्प पूर्ण झाल्यास गोंदिया जिल्ह्यातील ७ गावांतील ११७० हेक्टर शेतीला सिंचन सुविधेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची शेती सुजलाम-सुफलाम होईल. गोंदिया शहरवासीयांना १.७७ दलघमी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देखील होणार आहे. क्षेत्रातील लोकप्रतिनिधी सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोणते पाऊल उचलतात याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.**